# प्रेसनोट

नाशिक,
दिनांक : २८/१२/२०१८

**आलोसे संतोष निवृत्ती शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, नेमणूक मुंबई नाका पोलीस स्टेशन, नाशिक शहर यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केले बाबत.**

---

यातील तक्रारदार यांचेविरूध्द मुंबई नाका पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या तक्रार अर्जाची चौकशी सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष निवृत्ती शिंदे हे करीत होते. सदर तक्रार अर्जाचे चौकशीकामी सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शिंदे यांनी तक्रारदार यांना वारंवार बोलावून त्यांचेकडे ५०,०००/— रूपये लाचेची मागणी केली व पैसे न दिल्यास ४२० चा गुन्हा दाखल करतो असे सांगितल्याने तक्रारदार यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष निवृत्ती शिंदे यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दिनांक १६/११/२०१८ रोजी ला.प्र.वि.नाशिक पथकाचे सापळापुर्व पडताळणी दरम्यान आलोसे संतोष निवृत्ती शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, नेमणूक मुंबई नाका पोलीस स्टेशन, नाशिक शहर यांनी तक्रारदार यांचेकडे पंच साक्षीदारांसमक्ष १०,०००/— रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरूध्द आज दिनांक २८/१२/२०१८ रोजी मुंबई नाका पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **<u>लॅडलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४</u>** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२—२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४—२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | **१०६४** |

**( प्रभाकर घाडगे )**
पोलीस उपअधीक्षक,
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता